**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात अर्धा टक्के कपात, सोने तारणावरही मिळणार अधिक कर्ज

- एक कोटी रुपयांहून अधिक बक्षिस असलेल्या १२ नक्षलवाद्यांचे गडचिरोलीत आत्मसमर्पण, शरण आलेल्या १३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह

- जगातला सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

**आणि**

- राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा जल्लोष

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. पतधोरण समितीनं रेपो दरात अर्धा टक्के कपात केली आहे. आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. फेब्रुवारीपासून सलग तिसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं व्याजदरात कपात केली असून या कालावधीत रेपो दर एकूण १ टक्क्यानं कमी झाला आहे.

चालू आर्थिक वर्षात चलनफुगवट्याचा दर ३ पूर्णांक ७ दशांश टक्के पर्यंत आटोक्यात राहील असा सुधारित अंदाज पत धोरण समितीनं आढाव्यात व्यक्त केला आहे. या आधी हा दर ४ टक्के राहील असा अंदाज होता. चालू आर्थिक वर्षासाठी देशाचा आर्थिक वृद्धी दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे.

सोन्याचे दागिने गहाण ठेवून अडीच लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्यांना आता ७५ ऐवजी ८५ टक्के इतक्या रकमेचं कर्ज मिळेल, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. देशात परकीय चलनाचा पुरेसा साठा असल्याचंही त्यांनी आज स्पष्ट केलं.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर कपातीचा जोरदार परिणाम आज शेअर बाजारात दिसून आला. सेन्सेक्स ७४७ अंकांनी वधारुन ८२ हजार १८९ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५२

अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ३ अंकांवर स्थिरावला. बँका आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रातले समभाग आज तेजीत होते.

**<><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज गडचिरोली पोलिस मुख्यालयात १२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यांच्यावर सुमारे १ कोटी १२ लाख रुपयांचे बक्षीस होतं. यावेळी आत्मसमर्पण केलेल्या १३ नक्षलवाद्यांचा सामुदायिक विवाह लावून देण्यात आला. नक्षलवादाच्या विरोधात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला असून, नक्षलवादाविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

- **- होल्ड - फडणवीस - -**

- **<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू - काश्मिरमध्ये जगातला सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. देश आता काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वे मार्गाने जोडला गेला असल्याचं ते म्हणाले. पहलगाम हल्ल्याविषयी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड.. बाईट - नरेंद्र मोदी**

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या काळात सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी सरकारनं विविध पावलं उचलली आहेत. ऐकूया एक आढावा…

**होल्ड - व्हाइस कास्ट**

गेल्या दशकात भारताचा समृद्ध वारसा आणि वैविध्यपूर्ण संस्कृतीचं पुनरुज्जीवन झालं आहे. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाच्या निमित्त आयोजित आझादी का अमृत महोत्सवासारख्या मोहिमेअंतर्गत देशभरात सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित झाले. भारताच्या स्वातंत्र्यसेनानींचा सन्मान करण्यासाठी, त्यांचा वारसा जपण्यासाठी सरकारनं प्रयत्न केले. प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय पोलिस स्मारक, आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालये, भारत मंडपम आणि नवीन संसद इमारत यांचं लोकार्पण झालं. एक भारत, श्रेष्ठ भारत उपक्रम, काशी तमिळ संगमम आणि महाकुंभ यामध्ये

६६ कोटींहून अधिक जण सहभागी झाले. तसंच बौद्ध शिखर परिषद आणि शीख गुरुंच्या प्रकाश पर्व यासारख्या कार्यक्रमांनी भारताच्या आध्यात्मिक वारशाला बळकटी दिली. गेल्या दशकात योग ही एक जागतिक चळवळ बनली आहे. आयुष व्हिसा, जागतिक आरोग्य संस्थेशी भागीदारी यामुळे आयुर्वेदाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे. गेल्या दहा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारताचं स्थान वाढलं असून भारतात ४३ जागतिक वारसा स्थळं आहेत. याशिवाय, वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट सारखे कार्यक्रम जागतिक व्यासपीठावर भारताच्या माध्यम आणि मनोरंजन प्रतिभेचे प्रदर्शन करत आहेत. भारतीय सण-उत्सव, योगा, संगीत आणि कलेला अनेक देशांमध्ये सन्मान मिळतो आहे.

**<><><><>**

विकसित भारत घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात सुधारणा आणि विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरात कृषी संकल्प अभियान सुरू केलं आहे. नंदुरबार जिल्ह्यात अडगाव या संपूर्ण आदिवासी गावात आज या अभियाना अंतर्गत शेतकरी मेळावा घेण्यात आला. याविषयी शेतकरी योगेश रावताळे यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.

**होल्ड - बाईट- नंदूरबार योगेश रावताळे**

**<><><><>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा आज **किल्ले रायगडा**वर मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या जयजयकारानं यावेळी किल्ले रायगड दुमदुमून गेला होता. पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी सादर केलेल्या लोककला आणि पोवाड्यांमुळं रायगडावरचं वातावरण शिवमय झालं होतं. छत्रपती संभाजी राजे आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी महाराजांना यावेळी शासकीय मानवंदना देण्यात आली.

राज्यात इतरत्रही यानिमित्त विविध कार्यक्रम झाले. **नंदुरबारमध्ये** आज शिवराज्याभिषेक गुढी उभारण्यात आली होती. **परभणी** जिल्हा परिषदेनंही शिवाजी

महाराजांच्या चरित्र ग्रंथांचं वितरण केलं. **धुळ्या**त शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिषेक करण्यात आला.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय परीक्षा मंडळाला ३ ऑगस्ट रोजी एकाच सत्रात नीट प्रवेश परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. याआधी ही परीक्षा १५ जूनला होणार होती.

<><><><>

मुंबईतल्या मिठी नदीच्या गाळ उपसा घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं आज मुंबई आणि केरळच्या कोची इथं १५ हून अधिक ठिकाणी छापे टाकले. या छाप्यांमध्ये बॉलीवूड अभिनेता दिनो मोरिया, महानगरपालिकेचे सहाय्यक अभियंता प्रशांत रामुगडे आणि अनेक कंत्राटदारांच्या घरांचा समावेश आहे. मिठी नदीच्या गाळ उपसा घोटाळ्यात मुंबई महानगरपालिकेला ६५ कोटी रुपयांचं नुकसान झालं असून त्याची पीएमएलए कायद्यांर्गत चौकशी सुरू आहे.

<><><><>

एसटी महामंडळाच्या जागांचा पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) अशा पद्धतीने व्यावसायिक स्वरूपात विकास करून एस.टी.चं उत्पन्न वाढवण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या. यात जागांचं अ, ब आणि क असं वर्गीकरण केलं जाईल.

<><><><>

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोवंश हत्या होऊ नये यासाठी तस्करांना जेरबंद करा, असे आदेश पालकमंत्री आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिसांना दिले आहेत. नागपुरात जुनी कामठी भागात पोलिसांनी केलेल्या कारवाईत २३८ गोवंशीय प्राण्यांची सुटका करण्यात आली आणि सुमारे २४ लाखांच्या मुद्देमालासह तस्करांच्या टोळीला अटक करण्यात आली आहे.

<><><><>

गोंदिया जिल्ह्यात सडक अर्जुनी वनक्षेत्रात जांभळी इथं चितळ प्राण्याची शिकार करून त्याचं मांस शिजवून खात असलेल्या चौघांना सडक अर्जुनी वनविभागाच्या पथकानं अटक केली आहे. सर्व आरोपींना ७ जूनपर्यंत वन कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७ .०० वाजता
६ जून २०२५ - शुक्रवार

<><><><>

वाशिम जिल्ह्याच्या बेंबळा तालुक्यातल्या कारंजा ग्रामपंचायतीनं जिल्हा परिषदेच्या शाळेत मुलांना दाखल करणाऱ्या पालकांची घरपट्टी तसंच पाणीपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

<><><><>

श्रीक्षेत्र शेगाव इथून निघालेली संत गजानन महाराजांची पालखी आज अकोला शहरात दाखल झाली. पालखीचं भव्य स्वागत करण्यात आलं.

<><><><>

येत्या २ दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेच्या हवामानवृत्तात म्हटलं आहे.

<><><><>

बनावट नकाशे वापरून करण्यात आलेली मालाड मनोरी गावातली ४ अनधिकृत बांधकामं मुंबई महापालिकेनं जमीनदोस्त केली. गेल्या महिनाभरात अशा प्रकारच्या ४४ बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.

<><><><>

वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात विकास कामांसंदर्भात आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी कृषी, जलसंधारण, महावितरण, पाणीपुरवठा, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदी विभागांच्या योजनांची तपशीलवार माहिती घेतली.

//<><><><>//